।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

# साप्ताहिक माणदेश वार्ता

४२

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि.२३ मार्च २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक १३ वा

## विश्वरत्न विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी नरेश बनसोडे खजिनदारपदी प्रवीण बनसोडे, सचिवपदी विकास बनसोडे यांची निवड







सांगोला : विश्वरत्न विश्वभूषण प.पू.बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी नरेश बनसोडे, खजिनदारपदी प्रवीण बनसोडे तर सचिवपदी विकास बनसोडे यांची सर्वानुमतेने निवड करण्यात आली. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ २०२४-२५ ची वार्षिक अहवाल बैठक भिमनगर सांगोला येथे संपन्न झाली. सदरची बैठक रजि. मंडळाचे अध्यक्ष तानाजीबापू बनसोडे यांचे अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीमध्ये सन २०२४-२५ च्या जमा-खर्चाचे अहवाल वाचन करण्यात आले. या अहवालाचे वाचन सहसेक्रेटरी रूपेश जगन्नाथ बनसोडे यांनी केले. या अहवालास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. त्यानंतर २०२५-२६ या वर्षाकरिता रजि. मंडळाचे अध्यक्ष तथा बैठकीचे अध्यक्ष तानाजीबापू बनसोडे यांच्या परवानगीने नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. या नूतन कार्यकारिणीला सर्व संचालकांनी मान्यता दिली.

सन २०२५-२६ या वर्षाकरिता अध्यक्षपदी नरेश बापूसाहेब बनसोडे, उपाध्यक्षपदी महेश सुरेश प्रक्षाळे, राजू जालिंदर माने, विनोद विक्रम बनसोडे, स्वप्नील संभाजी कांबळे, सोमनाथ शिवाजी बनसोडे यांची तर खजिनदारपदी प्रविण तुकाराम बनसोडे, सहखजिनदार रूपेश जगन्नाथ बनसोडे, आकाश प्रकाश आठवले यांची तसेच सचिवपदी विकास नाना बनसोडे, सहसचिवपदी विनायक भगवान जावीर व विजय अनिल माने यांची तर कार्याध्यक्षपदी रणजित राजरत्न बनसोडे यांची निवड करण्यात आली.

जयश्री किशोर बनसोडे, रेश्मा दिपक बनसोडे, रतन संभाजी बनसोडे, रूपाली अशोक काटे, जयश्री नारायण कसबे, अविनाश आप्पा बनसोडे, अनिल दिनकर बनसोडे, रामा सुरेश बनसोडे, अमित सतिश सावंत, वैभव यशवंत भोरकडे, अतुल दिलीप बनसोडे, भिमराव प्रकाश बनसोडे, प्रविण गुणवंत जगधने, जय जोती बनसोडे, नानासाहेब महादेव सोनवणे, रघुनाथ(तात्या) गणपत शिवशरण यांची निवड करण्यात आली. त्याचबरोबर प्रसिध्दी प्रमुखपदी बापूसाहेब चंदू ठोकळे यांची निवड करण्यात आली. नूतन कार्यकारिणीचे सर्व स्तरातून अभिनंदन व्यक्त केले जात असून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. सदरच्या बैठकीस भीमसैनिक व भिमकन्या मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विशेष पोलीस महानिरीक्षक श्री.सुनील फुलारी यांनी पोलीस कर्मचाऱ्यांचा दरबार घेऊन त्यांना असणाऱ्या अडीअडचणी घेतल्या ऐकून

### सांगोल्यात पोलीस स्टेशनची वार्षिक तपासणी



सांगोला :कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक श्री. सुनील फुलारी यांनी शुक्रवारी सांगोला पोलीस स्टेशनला भेट दिली. यावेळी पोलीस निरीक्षक भिमराव खणदाळे यांनी त्यांना मानवंदना दिली. त्यानंतर विशेष पोलिस महानिरीक्षक श्री.सुनील फुलारी पोलीस स्टेशनची वार्षिक तपासणी केली.

या तपासणीदरम्यान पोलीस स्टेशन, व पोलीस स्टेशन परिसराची पाहणी केली, तसेच पोलिस कर्मचारी सर्व अधिकारी व यांचे कामाचा आढावा घेऊन चांगले काम करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत केले. तसेच त्यांनी पोलीस कर्मचारी यांचा दरबार घेऊन त्यांना असणाऱ्या अडीअडचणी ऐकून घेतल्या तसेच त्यांना कामामध्ये येणाऱ्या अडीअडचणी बाबत विचारणा केली.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक भिमराव खणदाळे यांच्यासह पोलीस अधिकारी तसेच कर्मचारी हजर होते. ऑक्सीजन पार्क, व्हॉलीबॉल मैदान, ओपन जिमचे यावेळी उद्घाटन करण्यात आले.

श्री.सुनिल फुलारी (भा.पो.से.) यांना सलग दुसऱ्यांदा केंद्रीय गृह मंत्रालयाच्या वतीने उत्कृष्ट प्रशासकीय सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृहात नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

यावेळी माजी नगराध्यक्ष प्रबुध्दचंद्र झपके, डॉ.प्रभाकर माळी, सीए.के.एस.माळी, संजय नवले, गोविंद माळी, सुरेश माळी, मारुतीआबा बनकर, अरविंद केदार, बापूसाहेब ठोकळे, किशोर बनसोडे, दिपक बनसोडे, आनंद घोंगडे, बापूसाहेब भाकरे, इंजि.संतोष भोसले, राजेंद्र यादव, दादा खडतरे, अच्युत फुले, मुधकर बनसोडे, संतोष महिमकर, कमरुद्दीन खतीब, सांगोला शहरातील प्रतिष्ठीत नागरिक, सामाजिक संस्थाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## वन विभागातील अपहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी -आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांची विधानसभेत मागणी

विधानसभा सभागृहात लक्षवेधी सूचनेअंतर्गत वनविभागात झालेल्या अपहाराची चौकशी करण्यात यावी अशी मागणी सांगोला विधानसभा मतदार संघाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी विधानसभेत केली.

यामध्ये सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा या तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक वनीकरण विभागाच्या वृक्ष लागवड योजनेमध्ये संबंधित विभागाच्या तत्कालिन अधिकारी व इतर ७ अधिकारी यांनी १०९ कोटी रूपयांचा अपहार केल्याचे मंत्री महोदयांच्या निर्दशनास आणून दिले.

त्याचबरोबर राज्य शासनाच्या वन विभागाने सुमारे ३३ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट डोळयासमोर ठेऊन प्रत्येक जिल्ह्यातील वन विभागाअंतर्गत सामाजिक वनीकरण योजनेंतर्गत वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता, परंतु सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा तालुक्यात प्रत्यक्षात वृक्ष लागवड न करता, रोपवाटीका न जगवता, रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड न करता, खते व पाणी न देता, त्याचे संगोपन न करता खाजगी वन संरक्षक व इतरांच्या नावे बोगस बिले काढून तत्कालीन वन अधिकारी व इतर ७ जणांनी बनावट, बोगस अहवाल, प्रतिज्ञापत्र व इतर कागदपत्रे तयार करून शासनाची दिशाभूल करून करोडो रूपयांची संगनमताने शासनाची फसवणूक करण्यात आली आहे.

तरी शासनाची फसवणूक करण्यात येणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणतीही कारवाई अद्याप करण्यात आलेली नसून दोषींवर लवकरात लवकर कारवाई करावी अशी मागणी केली. याचबरोबर यावर मंत्री महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत, शासन लवकरात लवकर दोषींवर कारवाई करेल असे सांगितले.

## न्यायाधीश तेजवंतसिंघ संधू यांनी ७० जोडप्यांना आणले एकत्र



सांगोला : आधुनिक युगात मोबाईलच्या फायद्याबरोबरच अनेक तोट्यांचा सामना समाजाला करावा लागत आहे. मोबाईलवरील शुल्लक मेसेज व किरकोळ कारणावरुन पतीपत्नीमध्ये वाद होतात. वादाचे पर्यावसन न्यायालयापर्यंत पोहोचते. न्यायालयात खावटी, हुंडाबळी यासह मानसिक व शारीरिक छळाच्या प्रकरणांचा न्याय निवाडा होत असतो. न्यायालयात न्याय करतांनाच येथील वरीष्ठ स्तर न्यायालयातील न्यायाधीश तेजवंतसिंघ संधू यांनी दोघांना समज देत अवघ्या पाऊणेतीन वर्षात ७० जोडप्यांना विभक्त होण्यापासून वाचवले आहे. त्यांनी मने दुभंगलेल्या या जोडप्यांना एकत्र आणत त्यांच्या संसाराची घडी बसवली आहे.

न्यायाधीश तेजवंतसिंघ संधू हे १९ वर्षापासून न्यायाधीश आहेत. त्यांनी मालेगावसह विविध न्यायालयांमध्ये न्यायदानाचे काम केले आहे. घटस्फोटाचे अनेक प्रकरणे त्यांच्याकडे येत असतात. श्री. संधू हे आलेल्या जोडप्यांचे निराकरण करून त्यांच्या संसाराची घडी जुळवली आहे. येथील गांगुर्डे दाम्पत्यांचे प्रकरण जानेवारी २०२० पासून न्यायालयात खावटी संदर्भात दाखल होते. ८ महिन्यापुर्वी हा खटला न्यायाधीश संधू यांच्यासमोर आला. गांगुर्डे दाम्पत्याला लावण्या व जान्हवी या दोन कन्या आहेत. श्री. संधू यांनी या मुलींच्या उज्वल भविष्यासाठी तुम्ही एकत्र या असे सांगत त्यांना मार्गदर्शन केले. गांगुर्डे दाम्पत्याने न्यायाधीश संधू यांचे म्हणणे ऐकूण दोघांनी पाच वर्षानंतर पुन्हा एकत्र येण्याचा निर्णय घेतला. २२ मार्चला दोघांनी या निर्णयाचे स्वागत करत एकमेकांना गुलाबपुष्प दिले. अॅड.मनोज पवार, अॅड.एस. आर.पाटील या वादीप्रतिवादींच्या वकीलांचीही साथ मिळाली. यावेळी अॅड.अजीम खान, अॅड.वासिफ शेख, अॅड.ए.ए. खान, अॅड.एस. के.भामरे, अॅड.सी.पी. देवरे, अॅड.अग्रवाल आदी उपस्थित होते.यावेळी नाशिक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण चे अध्यक्ष श्री जगमलानी आणि मालेगाव तालुका विधी सेवा समिती चे अध्यक्ष श्री कंठाळे यांचे मार्गदर्शन मिळाले.

घटस्फोट होणाऱ्या दाम्पत्याला जुळविण्याचे निर्णय कौतुकास्पद आहे. समाजात न्यायाधीश तेजवंतसिंह संधू यांच्यासारखे न्यायाधीश कमी आहेत. घटस्फोट झाल्यानंतर माझ्या मुलींना मोठ्या त्रासाचा सामना करावा लागला असता. योग्यवेळी निर्णय झाला.

**– महेंद्र गांगुर्डे**

न्यायाधीश संधू हे देव म्हणून आम्हाला भेटले. त्यांच्यामुळे आमचा संसार पुन्हा जुळला आहे. त्यांनी आम्हाला योग्य मार्गदर्शन व सल्ला दिल्याने हे शक्य झाले. न्यायाधीशांबरोबरच आमच्या वकीलांचा मोठा सहभाग आहे.

**– मनिषा गांगुर्डे**

१९ वर्षात न्याय करता करता अनेक जोडप्यांना एकत्र आणले आहे. तोडणे सोपे आहे, संसाराला जोडणे हे कठीण काम असते. येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नाशिकचे अध्यक्ष जगमलानी व तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष कंठाले यांच्या मार्गदर्शनाखाली दोन वर्षे दहा महिन्यात ७० जोडप्यांच्या संसाराची घडी बसवली. हे पुण्याचे काम आहे.

**– तेजवंतसिंघ संधू**
वरीष्ठ न्यायाधीश, मालेगाव

# संपादकीय......


जुने वर्ष–४२ वे

अंक–१७ वा


## आधार–मतदारांचे फोटो ओळखपत्र लिंकिंगमुळे भारताच्या निवडणूक व्यवस्थेची अखंडता वंचित राहील

निवडणूक आयोगाने म्हटले आहे की मतदारांचे फोटो ओळखपत्र आधारशी जोडणे केवळ कलम ३२६ नुसारच केले जाईल, ज्यामध्ये असे म्हटले आहे की, मतदानाचा अधिकार फक्त नागरिकांनाच दिला जाऊ शकतो, तर आधार कार्ड केवळ व्यक्तीची ओळख स्थापित करते.२०२३ मध्ये निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की मतदार यादी अंतिम करण्याच्या प्रक्रियेत त्यांनी आतापर्यंत जवळजवळ ६६.२३ कोटी आधार कार्ड अपलोड केले आहेत, हे लक्षात घेता ही आश्वासने पोकळ भाषणे आहेत.सर्वोच्च न्यायालयाने अन्यथा निर्णय देण्यापूर्वी बँकांनी आधार बँक खात्यांशी जोडण्यासाठी केलेल्या सक्तीपूर्ण उपाययोजनांद्वारे निवडणूक आयोगाने हे साध्य केले.

२०२१ मध्ये ही जोडणी सुलभ करण्यासाठी कायदा लागू होत असतानाही, संविधानात्मक आचार गटाने १०४ माजी वरिष्ठ नागरी सेवकांच्या स्वाक्षरीने एक सार्वजनिक निवेदन जारी केले, ज्यापैकी बहुतेकांना मतदार नोंदणी आणि निवडणुका आयोजित करण्याचा थेट अनुभव आहे. याला धोकादायक पाऊल म्हणत,सीसीजीच्या निवेदनात म्हटले आहे की भावी किंवा नोंदणीकृत मतदाराकडून आधार पडताळणीची आवश्यकता, जरी ऐच्छिक असली तरी, ओळख आणि पत्ता पडताळणीसाठी सरकारने जारी केलेले ओळखपत्र वापरणे सूचित करते जे निवडणूक आयोगाच्या स्वातंत्र्य आणि अखंडतेला गंभीरपणे कमजोर करू शकते आणि संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षतेवर शंका निर्माण करू शकते.मतदार ओळखपत्रांसाठी आधार पडताळणीची आवश्यकता का आहे याची अनेक कारणे सीसीजीने दिली आहेत. ही कारवाई सदोष, कायद्याने वाईट, वाईट श्रद्धेने आणि राज्याकडून संभाव्य गैरवापरास कारणीभूत आहे:या शब्दांमुळे होणारा संभाव्य गैरप्रकार दुरुस्ती कायद्यातील पुढील कलमांद्वारे स्पष्ट होतो, जे सरकारला त्याच्या नियम–निर्धारण अधिकारांनुसार, मतदारांना आधार क्रमांक कळविण्याची प्रक्रिया लिहून देण्याची परवानगी देते.सरकारने बनवलेल्या नियमांना संसदीय मंजुरीची आवश्यकता नाही. म्हणून, असा नियम सहजपणे आणता येतो, ज्यामुळे मतदार नोंदणीसाठी आधार क्रमांक देणे ही एक पूर्वअट बनते.मतदार यादीतून मोठ्या प्रमाणात नावे वगळण्याची शक्यता निर्माण होऊ शकते, कारण अनेक विद्यमान मतदार त्यांचे आधार तपशील निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांना देऊ शकत नाहीत (किंवा न देण्याचा निर्णय घेऊ शकतात).आधार कायद्याच्या कलम २३(जी) अंतर्गत आधार क्रमांक वगळण्याच्या किंवा निष्क्रिय करण्याच्या णखऊ–ख च्या अधिकारांमुळे मतदार यादीतून मोठ्या प्रमाणात नावे वगळली जाण्याची शक्यता आहे.आजपर्यंत, निवडणूक आयोगाने या गंभीर चिंतांना प्रतिसाद दिलेला नाही किंवा त्यांचे उत्तर देणे हे त्याचे कर्तव्य आहे.जे मतदारांचे आधार क्रमांक गोळा करण्यासाठी सादर करण्यात आला होता त्याची रचना करण्यात आली आहे तेव्हा खरी ठरली आहे. सध्या या फॉर्ममध्ये मतदारांना त्यांचा आधार क्रमांक देण्यापासून दूर राहण्याचे पर्याय नाहीत; ते फक्त दोन पर्याय देतात: एकतर तुमचा आधार क्रमांक द्या किंवा घोषित करा की माझ्याकडे आधार क्रमांक नसल्यामुळे मी माझा आधार देऊ शकत नाही.केंद्रीय कायदा मंत्रालयाने यात सुधारणा करायची आहे, परंतु मतदारांना त्यांचा आधार क्रमांक का देत नाहीत याचे स्पष्टीकरण द्यावे लागेल.हे मतदारावर जबरदस्ती करणे आणि नोंदणी प्रक्रियेतील फसवणूक करण्याशिवाय दुसरे काहीही नाही.आधार दस्तऐवजाच्या प्रामाणिकपणावरही गंभीर प्रश्न आहेत. केंद्र सरकारने म्हटले आहे की आर्थिक वर्ष २०२५ पर्यंत निर्माण झालेल्या एकूण ८२.९३ कोटी आधार नोंदणीपैकी सुमारे ९.७३ कोटी नोंदणी डुप्लिकेशन, गुणवत्ता किंवा तांत्रिक कारणांमुळे नाकारण्यात आल्या.

युआयडीने फक्त हे अहवाल नाकारले आहेत आणि जेव्हा ते प्रसिद्ध करतात तेव्हा माध्यमांना गप्प करण्याचा प्रयत्न केला आहे! मतदारांचे फोटो ओळखपत्रला आधारशी जोडल्याने मोठ्या प्रमाणात मतदानापासून वंचित राहावे लागू शकते अशीही चिंता आहे. उदाहरणार्थ, तेलंगणामध्ये अशाच प्रकारच्या लिंकेज कार्यक्रमामुळे अनेक मतदार मतदार यादीतून वगळले गेले; हैदराबाद परिसरात अधिकाऱ्यांनी घरोघरी जाऊन पडताळणी पूर्णपणे केली नसल्याची नोंद आहे.युआयडीने २०१८ मध्ये असेही म्हटले होते की सरकारी सेवांसाठी प्रमाणीकरण अपयशाचा दर १२% पर्यंत होता. मतदार यादीसाठी अपयशाचा दर खूपच जास्त असू शकतो.असा युक्तिवाद करण्यात आला की, हे लिंकेज कायदेशीर राज्य हित पूर्ण करेल, जे सर्वोच्च न्यायालयाने न्यायमूर्ती के.एस. पुट्टास्वामी प्रकरणात गोपनीयतेच्या अतिक्रमणासाठी परवानगी असलेल्या मर्यादेचा निर्णय देताना एक निकष म्हणून ठेवले होते.परंतु प्रश्न असा आहे की निवडणूक आयोगाचे काम राज्य हिताची काळजी घेणे आहे की नागरिकांच्या हिताचे रक्षण करणे आहे.अशा परिस्थितीत, आधार मतदारांचे फोटो ओळखपत्रला जोडल्याने भारताच्या निवडणूक व्यवस्थेत उरलेली कोणतीही अखंडता संपुष्टात येईल. शिवाय, मतदारांचे प्रोफाइलिंग आणि मतदानापासून वंचित ठेवणे हे एक घातक संयोजन ठरेल जे भारताच्या निवडणूक लोकशाहीला बुडवू शकते. निवडणूक आयोगाने हा निर्णय पूर्णपणे सोडून देणे आणि निवडणूक लोकशाहीचे महत्त्वाचे भागधारक असलेल्या सीसीजी आणि इतर तज्ज्ञांनी उपस्थित केलेल्या गंभीर चिंतांचे निराकरण केल्यानंतरच ते घेणे योग्य ठरेल. केवळ बंद दाराआड बैठका आणि राजकीय पक्षांशी चर्चा करून काही होणार नाही!

## टेक वार्ता

### युपीआय  मध्ये एक मोठा बदल होणार; ऑटो-डेबिटसह युपीआय  पुल व्यवहार बंद होऊ शकतात

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (युपीआय) पेमेंट फसवणूक रोखण्यासाठी सतत प्रयत्न करत आहे. याबद्दल, ते णझख (युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस) शी संबंधित सुरक्षा वैशिष्ट्ये सतत मजबूत करत आहे.

आता पेमेंट फसवणूक रोखण्यासाठी एनपीआय णझख मध्ये एक मोठा बदल होणार:ऑटो-डेबिटसह णझख पुल व्यवहार बंद होऊ शकतात, जाणून घ्या तुमच्यावर काय परिणाम होईल.नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (युपीआय ) पेमेंट फसवणूक रोखण्यासाठी सतत प्रयत्न करत आहे. याबद्दल, ते युपीआय  (युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस) शी संबंधित सुरक्षा वैशिष्ट्ये सतत मजबूत करत आहे.

आता पेमेंट फसवणूक रोखण्यासाठी एनपीसीआय युपीआयशी संबंधित नियमांमध्ये काही आवश्यक बदल करू शकते. यामध्ये 'पुल ट्रान्झॅक्शन' फीचर बंद करण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो. एनपीसीआय याबाबत बँकांशी चर्चा करत आहे. हे फीचर बंद झाल्यानंतर, युपीआयशी संबंधित सायबर फसवणुकीच्या घटना कमी होतील.युपीआय  मध्ये व्यवहार दोन प्रकारे होतात. पहिला पुश व्यवहार आणि पुल व्यवहार.जेव्हा एखादा व्यापारी वस्तू किंवा सेवांच्या बदल्यात ग्राहकाला पैसे देण्याची विनंती पाठवतो, तेव्हा त्याला 'पुल ट्रान्झॅक्शन' म्हणतात. या व्यवहारात देयक रक्कम आगाऊ निश्चित केली जाते. ग्राहकाला फक्त त्याचा युपीआय  पिन टाकावा लागेल.येथे आपण हे स्पष्ट करूया की ऑनलाइन दुकाने, दुकाने किंवा रेस्टॉरंट्स, वीज, मोबाईल रिचार्ज इत्यादी सेवा देणाऱ्या कंपन्यांना मर्चेंट्स म्हणतात, कारण ते ग्राहकांकडून पैसे घेतात.तर, जेव्हा ग्राहक स्वतः ढ कोड स्कॅन करून किंवा मोबाईल नंबर टाकून पैसे पाठवतो, तेव्हा त्याला 'पुश ट्रान्झॅक्शन' म्हणतात. यामध्ये ग्राहक स्वतः पेमेंट रक्कम प्रविष्ट करतो.

एनपीसीआय सध्या बँकांशी ते बंद करण्याबाबत बोलत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, ही चर्चा अद्याप पहिल्या टप्प्यात आहे. भविष्यात जर पुल व्यवहार बंद केले गेले, तर ग्राहकांना काही संभाव्य फायदे मिळू शकतात.

'पुल ट्रान्झॅक्शन्स' बंद केल्याने ऑटो-डेबिट आधारित सबस्क्रिप्शन आणि बिल पेमेंटवर परिणाम होईल. सध्या, बरेच लोक वीज, मोबाईल रिचार्ज, गॅस आणि इतर बिले ऑटो-डेबिटवर सेट करतात. यामुळे, दरमहा त्यांच्या बँक खात्यातून पैसे आपोआप कापले जातात. ही सुविधा बंद झाल्यानंतर, वापरकर्त्याला दरमहा मॅन्युअली पेमेंट करावे लागेल.

युपीआयचे 'पुल ट्रान्झॅक्शन' वैशिष्ट्य बंद झाल्यानंतर, ऑटो-डेबिटमध्ये काही बदल दिसू शकतात. ऑटो-डेबिटचा वापर प्रामुख्याने वीज बिल, मोबाईल रिचार्ज, ओटीटी सबस्क्रिप्शन, कर्ज ईएमआय, विमा प्रीमियम, एसआयपी गुंतवणूक, म्युच्युअल फंड यासाठी केला जात असे. आता या सेवांसाठी नवीन पर्याय स्वीकारावे लागतील. आता ग्राहकांना युपीआय  सूचना किंवा ड्ढड द्वारे पेमेंट मंजूर करावे लागेल. ईएमआय पेमेंट ॲप्स किंवा बँकिंग ॲप्समध्ये ऑटो-डेबिट पर्याय उपलब्ध असेल, परंतु प्रत्येक वेळी मंजुरी आवश्यक असेल.

सुरक्षित ऑटो-डेबिटसाठी काही इतर वैशिष्ट्ये देखील आहेत. यापैकी प्रमुख म्हणजे ई-केवायसी सेतू प्रणाली, जी ग्राहकांची ओळख सुरक्षितपणे आणि प्रभावीपणे पडताळण्यास मदत करते. ई-केवायसी सेतू प्रणालीचे अनेक फायदे आहेत. जसे की-ही प्रणाली आधार-आधारित ई-केवायसी प्रमाणीकरण वापरते, ज्याद्वारे आधार क्रमांक शेअर केल्याशिवाय ग्राहकाची ओळख पडताळता येत नाही.डिजिटल पडताळणीमुळे कागदपत्रांची आवश्यकता नाही.

युपीआय  'पुल ट्रान्झॅक्शन' फीचर बंद झाल्यानंतर, ग्राहकांना त्यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या बँक खात्यातून पैसे कापले जाणार नाहीत, याची खात्री करावी लागेल. यासाठी, स्वतःला सतर्क ठेवणे हा सर्वोत्तम सुरक्षितता उपाय आहे. जर ग्राहकांनी युपीआय ऑटोपे, बँक अलर्ट, मर्यादा सेटिंग्ज आणि ई-मँडेट व्यवस्थापन योग्यरित्या वापरले तर परवानगीशिवाय पैसे कापले जाणार नाहीत. तुमच्या बँक आणि युपीआय  ॲपवर जा आणि ड्ढड आणि ईमेल अलर्ट चालू करा.जर कोणताही अनधिकृत व्यवहार आढळला तर ताबडतोब बँकेला कळवा.बँक आणि णझख ॲप (फोनपे, गुगलपे, पेटीएम) वर जाऊन युपीआय  व्यवहार मर्यादा सेट करा.मोठ्या रकमेसाठी ओटीपी किंवा युपीआय  पिन आवश्यक आहे, याची खात्री करण्यासाठी तुमच्या बँकेशी संपर्क साधा.महिन्यातून किमान एकदा बँक स्टेटमेंट आणि णझख व्यवहारांचा आढावा घ्या.अज्ञात नंबर किंवा ईमेलवरून येणाऱ्या पेमेंट लिंक्सवर क्लिक करू नका.

## सुविचार

**अस्तित्व टिकवायच असेल तर स्वत:मध्ये हिम्मत पाहिजे,एकट असलं तरी सर्वांना पुरून उरायचं.**


साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com

संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# मयत कर्जदार महिलांचे तब्बल ५७ लाख १९ हजार रुपयांचे कर्ज माफ करून फॅबटेक मल्टीस्टेट ने जपली माणूसकी

## फॅबटेकच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे अनेक कुटुंबांना दिलासा



सांगोला : विविध बँका, मल्टीस्टेट, पतसंस्था यांच्याकडून कर्ज वसुलीसाठी सध्या मार्च अखेरमुळे मोठा धुमधडाका सुरू असताना, नामवंत फॅब्टेक मल्टीस्टेटने एक दोन नव्हे तर तब्बल ९० मयत कर्जदार महिलांचे ५७ लाख १९ हजार रुपयांचे कर्ज माफ करून फॅब्टेक मल्टीस्टेट ने माणूसकी जपली आहे. सदर कर्जदार मयत महिलांच्या नातेवाईकांना महिला दिनाचे औचित्य साधून कर्जमाफीचा दाखला देखील देण्यात आला आहे. ना जीआर, ना घोषणा, थेट अंमलबजावणी हे फक्त फॅबटेक मल्टीस्टेटचं करू शकते यानिमित्ताने फॅबटेक उद्योग समूहाचे सर्वेसर्वा उद्योगपती भाऊसाहेब रुपनर यांच्या या निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक आणि स्वागत होत आहे.

फॅबटेक मल्टीस्टेट को – ऑप. क्रेडिट सोसायटी लि. सांगोला ही वित्तीय क्षेत्रातील अग्रगण्य संस्था असूनही नेहमीच सभासदांच्या हिताचे निर्णय आजवर घेतले आहेत. यासाठी संस्थेने स्वतःच्या नफ्यातील स्वनिधितून अशा सामाजिक उपक्रमासाठी निधी देत असते, यातूनच वरील कर्ज माफ करण्यात आले आहेत. महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात ३० शाखा कार्यरत असून या वेगवेगळ्या शाखेतून महिलांना बचत गटाच्या माध्यमातून उद्योग क्षेत्राला चालना मिळावी यासह महिला आर्थिक सक्षमीकरण व्हावे व त्यांच्या कुटुंबांना आर्थिक हातभार लागावा म्हणून कर्ज वाटप केले जाते.

यामधून महिलांनी वेगवेगळे उद्योग निर्मिती करून उद्योग व्यवसायात यशस्वी पाऊल टाकले आहे. यामधील ९० मयत कर्जदार महिलांचा समावेश होता. यासर्वच महिला कुटुंबातील कर्त्या स्त्री होत्या.

त्यांच्यावरच सर्व कुटुंबाची जबाबदारी होती. अशातच त्यांचा मृत्यू झाल्याने कुटुंबीय हवालदिल झाले होते. त्याचवेळी फॅबटेक मल्टीस्टेट को – ऑ क्रेडिट सोसायटी लि.सांगोला संस्थापकिय चेअरमन भाऊसाहेब रुपनर यांनी सांत्वन भेटीवेळी संस्थेने त्यांचे कर्ज पूर्ण सुरक्षित केले आहे. तुम्ही काळजी करू नका, असा धीर दिला. त्यामुळे कुटुंब व नातेवाईक यांनी संस्थेचे आभार मानले. संस्था आमच्या अडचणीच्या वेळी अगदी देवासारखी धावून आली, असे उद्गार संबंधित ९० कुटुंबातील नातेवाईकांनी काढले.

फॅब्टेक मल्टीस्टेट ने नेहमीच सभासदांना उत्तम सेवा देण्याचा मानस ठेवलेला आहे, आणि त्याप्रमाणे आपण आजवर सामाजिक बांधिलकीही जपली आहे. सहकाराअंतर्गत सहकार या तत्वानुसार फॅब्टेक मल्टीस्टेट ही संस्था आपली जबाबदारी घेत आहे.

**–डॉ.सुरज रुपनर**
व्हा.चेअरमन, फॅब्टेक मल्टीस्टेट

ही संस्था ५०० कोटींच्या व्यवसायाकडे यशस्वी वाटचाल करत असून महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात एकूण ३० शाखा कार्यरत आहेत, जिथे सर्वसामान्य व वंचित घटकांचा, त्यांच्या आर्थिक सक्षमतेचा विचार पहिला केला जातो, त्यासाठी योग्य त्या कर्ज सुविधा आपल्या संस्थेच्या माध्यमातून आपण उपलब्ध करत असतो, आणि याचा बऱ्याच महिलांना व लघु उद्योजकांना आजवर फायदा झालेला आहे, यापुढेही होत राहणार आहे, सर्वसामान्यांच्या प्रगतीत आमच्या फॅबटेक मल्टीस्टेटची प्रगती दडलेली आहे.

**–भाऊसाहेब रुपनर**
(संस्थापक चेअरमन)

# जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेत आ.बाबासाहेब देशमुख यांनी केली निधीची मागणी



सांगोला : मुंबई येथे चालू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी विधानभवनात भेट घेत सांगोला तालुक्यातील माण नदीवरील पुरामुळे नुकसान झालेल्या ११ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या विशेष दुरुस्तीचा प्रस्तावास मंजूरी देण्यात यावी तसेच बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याकरिता निधीची तरतूद करण्यात यावी अशी मागणी केली.

सांगोला तालुक्यातील माण नदीवरील पुरामुळे नुकसान झालेल्या ११ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या विशेष दुरुस्तीचा प्रस्ताव महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे यांच्याकडून शासनास प्राप्त झालेला आहे. मात्र त्यास मंजुरी न मिळाल्याने दुष्काळी तालुक्यातील बंधाऱ्यांचा पूर्ण क्षमतेने वापर होत नाही. त्यासाठी सांगोला तालुक्यातील माण नदीवरील पुरामुळे नुकसान झालेल्या ११ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या विशेष दुरुस्तीचा प्रस्तावास तात्काळ मान्यता देऊन बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याकरिता निधीची तरतूद करण्याची आग्रही मागणी यावेळी आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी केली.

यावेळी जलसंपदा मंत्री मा. राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना तातडीने सूचना करत लवकरात लवकर निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली.


## अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट
## टेंडर नोटीस

**जा.क्र.२०२५/न.प.अ.कोट/संगणक २/संकलन–१/आर आर/कावि/ १७०४ दि.२०/०३/२०२५**

अक्कलकोट नगरपरिषदेकडील संगणक विभागाकडे खालील नमूद केलेल्या कामाकरिता संबंधित मक्तेदाराकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. कामाबाबतचा संपूर्ण तपशील व अटी शर्ती कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत (सुट्टीच्या दिवसा व्यतिरिक्त) नगरपरिषद संगणक विभागाकडे पहावयास मिळू शकेल. कोरे निविदा फॉर्म अभिलेख कार्यालयात मिळतील. त्याकरिता ठेकेदारांनी रोख रक्कम भरणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजीत किंमत रुपये | बयाणा रक्कम (रु.) | निविदेचा प्रकार व किंमत | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| १. | संगणक संगणक विभागाकडे दुरुस्ती व याकामी लागणारे साहित्य पुरवठा करणे. (निविदा स्पेसिफिकेशन प्रमाणे.) | रु. ४२००००/– | १००००/– | ब.१ रु. १०००/– | आवश्यकतेप्रमाणे |

वरील कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. २१/०३/२०२५ पासून दि. ०२/०४/२०२५ अखेर पर्यंत नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी १.०० वाजेपर्यंत मिळतील. बयाणा रक्कम स्विकारणेची अंतिम तारीख ०२/०४/२०२५ दुपारी २.०० वाजेपर्यंत राहील. बयाणा रक्कम रोखीने भरणेची आहे. बयाणा रक्कम भरल्याशिवाय निविदा स्विकारले जाणार नाही. सिलबंद निविदा दि. ०२/०४/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्विकारले जाईल. सिलबंद निविदा नगरपरिषद कार्यालयात आवक–जावक लिपिक यांचेकडे समक्ष आणून देणेत यावे. निविदेसंबंधी आवश्यक असलेली सर्व तांत्रिक कागदपत्रे एका लिफाप्या मध्ये (लिफाफा–अ) सिलबंद करणेचे आहे व भरलेली निविदा फॉर्म दुसऱ्या लिफाप्यामध्ये (लिफाफा–ब) सिलबंद करून सादर करणेचे आहे व दोन्ही लिफाफे मिळून मोठ्या लिफाफ्यामध्ये एकत्रितरीत्या सिलबंद करून देणेची आहे. मुदतीनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. दाखल झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी सायं. ५.०० वाजता उघडण्यात येतील. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क नगरपरिषदेला राहील. त्याची कारणे देणे नगरपरिषदेवर बंधनकारक राहणार नाहीत. निविदासंबंधी लागू असलेले नगरपरिषदेचे सर्व नियम मक्तेदारांवर बंधनकारक राहतील. बयाणा रक्कमेची मूळ पावती निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. आवश्यक ते सर्व कागदपत्रे निविदासोबत जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय निविदेचा विचार केला जाणार नाही. वरील कामांकरिता निधी उपलब्धते नुसार बिले अदा करणेत येतील.

अक्कलकोट नगर परिषद अक्कलकोट नगर परिषद जि. सोलापूर

सही/–
**(श्री. रमाकांत डाके)**
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगरपरिषद अक्कलकोट

# ३१ मार्चपर्यंत शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावे- तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव

## ४२ हजार ४४२ शेतकऱ्यांनी काढले शेतकरी ओळखपत्र




सांगोला : तालुक्यातील १ लाख ८ हजार ८२० खातेदार शेतकऱ्यांपैकी दि.१७ मार्च अखेर ४२ हजार ४४२ शेतकऱ्यांनी 'फार्मर आयडी' काढले असून, हे काम ४६ टक्के इतके झाले आहे. येत्या ३१ मार्चपर्यंत सर्व ७/१२ धारक शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावे, असे आवाहन कृषी विभागातर्फे तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव यांनी केले आहे.

फार्मर आयडी म्हणजे शेतीचे आधार कार्डच आहे. शेतकऱ्यांसाठी शासन नवनवीन योजना जाहीर करत आहे. मात्र या योजनांचा लाभ घ्यावयाचा असेल तर फार्मर आयडी अनिवार्य आहे. या फार्मर आयडीमध्ये शेतकऱ्यांच्या शेतीची माहिती संकलित होणार आहे. त्यात क्षेत्र, गाव, गट नंबर याचा समावेश असणार आहे. त्यात पीक कर्ज व त्या व्यतिरिक्त आणखी कुठले कर्ज घेतले आहे का, याचीही माहिती यात संकलित होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्याचा कायमस्वरूपी डेटाबेस तयार होणार आहे.

दरम्यान नैसर्गिक आपत्ती आली किंवा अतिवृष्टीने वा अन्य कारणाने शेतकऱ्यांचे नुकसान झाले तर त्याला शासकीय मदत मिळणे ही सोईस्कर होणार आहे. फार्मर आयडी काढण्यासाठी जवळच्या सीएससी केंद्राशी संपर्क करावा. यासह गावोगावी शेतकरी ओळखपत्र काढण्यासाठी कॅम्पचे नियोजन करण्यात आले आहे. तरी ज्या शेतकऱ्यांनी आज अखेर फार्मर आयडी शेतकरी ओळखपत्र काढलेले नाही अशा शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढून घ्यावे असे आवाहन तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव यांनी केले आहे.

सांगोला तालुक्यात १ लाख ८ हजार ८२० शेतकरी खातेदार आहेत. पैकी ७८ हजार ५३० शेतकऱ्यांना पी एम किसान योजनेचा लाभ दिला जात आहे. यापुढील काळात पी एम किसान योजनेचा व शासनाच्या शेतीविषयक सर्व योजना या शेतकरी ओळखपत्र द्वारे वितरित करण्यात येणार आहेत.

तालुक्यातील एकूण शेतकरी खातेदारकांपैकी ४२ हजार ४४२ शेतकऱ्यांनी शेतकरी ओळखपत्र काढून घेतले आहे. उर्वरित ६६ हजार ३७८ शेतकऱ्यांचे फार्मर आयडी काढण्यासाठी कृषी सहाय्यक, तलाठी व ग्राम विकास अधिकारी यांच्या मार्फत प्रयत्न सुरू असून येत्या मार्च अखेरपर्यंत सर्व शेतकऱ्यांनी आपले ओळखपत्र काढून घ्यावे.

# सांगोला महाविद्यालयात चिमणी दिन साजरा;सर्वांनी पक्षी संवर्धनाचे कार्य केले पाहिजे - राजेंद्र यादव



सांगोला : पक्षांचे संवर्धन ही काळाची गरज असून ग.दि.माडगूळकर यांच्या कवितेतील या चिमण्यांनो परत फिरा रे घराकडे अपुल्या, जाहल्या तिनी सांजा अशी सांज वेळ पक्षांच्या जीवनात येऊ नये त्यासाठी विद्यार्थी आणि सर्व नागरिकांनी पक्षी संवर्धनाचे कार्य केले पाहिजे असे मत आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष व पत्रकार राजेंद्र यादव यांनी २० मार्च जागतिक चिमणी दिवस निमित्त सांगोला महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.

सांगोला तालुक्यात अनेक नागरिक, विद्यार्थी पक्षी संवर्धनाचे कार्य करीत असल्यामुळे सांगोला तालुक्यात मोठ्या प्रमाणावर चिमण्यांचा वावर आढळून येतो. प्रा.डॉ.विधीन कांबळे यांच्या प्रयत्नामुळे व प्रेरणेने अनेक लोक पक्षी संवर्धनाच्या चळवळीत सहभागी होत आहेत असे ते म्हणाले. आजच्या युवकांनी खऱ्या अर्थाने या चळवळीत सहभागी होण्याची गरज आहे. भविष्यासाठी पर्यावरण जतन करण्याची जबाबदारी आजच्या युवकांनी घेतली पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी रसायनशास्त्र विभागातील प्रा.डॉ.प्रकाश बनसोडे यांनी कर्करोग आणि जैवविविधता याचा संबंध सांगताना सांगितले की, पक्षांची संख्या कमी झाल्यास कीटकांची संख्या वाढते व कीटकांच्या बंदोबस्त करण्यासाठी रासायनिक औषधांचा अथवा कीटकनाशकांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो आणि ही रसायने मानवी शरीरात जातात ज्यामुळे असाध्य अशा कर्करोगाला लोक बळी पडत आहेत. आपले आरोग्य निरोगी आणि आरामदायी करायचे असेल तर पर्यावरणाचे आणि पक्षी संवर्धनाचे कार्य सर्वांनी हाती घेतले पाहिजे असे सांगितले. प्रा. डॉ. विधीन कांबळे यांनी परिसरातील दुर्लक्षित पक्षी या विषयावरती सादरीकरण करून विद्यार्थी व उपस्थितीताना माहिती करून दिली.

आपल्या घरादाराच्या किंवा परसदारात असंख्य पक्षी वावरत असतात. मात्र आपल्याला या पक्षांची ओळख नसते आणि त्यामुळे अशा पक्षाचे महत्त्व आपल्याला समजत नाही वास्तविक पाहता सर्वच पक्षी एक समान मानतो पण पर्यावरणात प्रत्येक पक्षाचे वेगळे स्थान आहे. ते स्थान ढळू न देता त्याचे संवर्धन झाले पाहिजे असे त्यांनी सांगितले. सर्वांनी पर्यावरण आणि पक्षी-प्राणी मध्यवर्ती ठिकाणी ठेवून त्यांचे संवर्धन करण्याबरोबरच मानवी विकास साधता आला पाहिजे असे मत मांडले. अध्यक्षीय भाषणात प्र.प्राचार्य सुरेश भोसले यांनी सांगितले की, निसर्गात पक्षांकडून अनेक काही शिकण्यासारखे असते चिमणी सारखा साधा वाटणारा पक्षी सुद्धा अत्यंत हुशार आहे. पक्ष्यांची घरे बांधण्याची कला ही स्थापत्यशास्त्राला लाजवण्यासारखी असते. पक्षी प्राणी आणि पर्यावरणाचे जतन विद्यार्थ्यांनी केले पाहिजे असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे नियोजन प्राणीशास्त्र विभागातील प्रा. डॉ विजय यादव, प्रा.अशांक भोसले आणि प्रा. कु.सीमा बिचुकले, प्रयोगशाळा परिचर श्री.प्रदीप आसबे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.प्रसाद लोखंडे यांनी केले तर प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.विजय गाडेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. सदर कार्यक्रमासाठी बीएससी भाग-दोन आणि बीएससी भाग-३ प्राणीशास्त्र विषयाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# फॅबटेकमध्ये स्पर्धा व सरकारी परीक्षा मार्गदर्शन सत्राचे आयोजन

सांगोला : फॅबटेक टेक्नीकल कॅम्पस, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अँड रिसर्च मधील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागांतर्गत विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा व सरकारी परीक्षा मार्गदर्शन या विषयावर विशेष सत्र आयोजित केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा आणि सरकारी नोकरीसाठी आवश्यक कौशल्ये, तयारीचे तंत्र, तसेच परीक्षेचे स्वरूप याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या सत्रात नामवंत श्री.मयूर राजमाने ( संचालक, पार्वती अकॅडेमी आणि शाखा प्रमुख, सांगली / कोल्हापूर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेतील महत्त्वाचे घटक, वेळेचे व्यवस्थापन, प्रभावी अभ्यास पद्धती आणि यशस्वी उमेदवारांचे अनुभव याविषयी माहिती दिली. तसेच स्पर्धा परीक्षेतून भरल्या जाणाऱ्या सर्व पोस्ट ची माहिती दिली व वर्ग वाईज कुठल्या कुठल्या पोस्ट येतात यांची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या सत्राला हजेरी लावली आणि आपल्या शंकांचे निरसन केले.

हे विशेष सत्र फॅबटेक एज्युकेशन सोसायटी संस्थेचे चेअरमन श्री.भाऊसाहेब रुपनर, मॅनेजिंग डायरेक्टर डॉ.अमित रुपनर, व्यवस्थापकीय प्रतिनिधी प्राजक्ता रूपनर , कार्यकारी संचालक श्री.दिनेश रूपनर, कॅम्पस डायरेक्टर डॉ .संजय अदाटे, यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे, उप प्राचार्य प्रा.डॉ विद्याराणी क्षीरसागर यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या वतीने हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून भविष्यात असे उपयुक्त मार्गदर्शन विशेष सत्र राबवले जातील, अशी ग्वाही ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा. धनंजय शिवपूजे यांनी दिली.

